नि.फौ.खटला क्र.१६५/२०
सरकार / विठोबा गळवे
निशाणी क्र.३०

साक्षीदार क्र.२ यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | |
|---|---|
| माझे नाव | – संतोष विलास गळवे |
| वडीलांचे नाव | – विलास महादेव गळवे |
| वय | – २७ वर्षे |
| व्यवसाय | – शेती |
| राहणार | – मापटेमळा, ता. आटपाडी, जि. सांगली. |

**सरतपास सहा. सरकारी वकील श्री.बी.डी.काळे यांचेमार्फत शपथेवर सुरु**

१. दिनांक २५/०८/२०२० रोजी पोलीसांनी मला गळवेवाडी हद्दीत वाड्याचा टेक येथे बोलवले होते. सदरचे ठिकाण रोहित किसन करचे यांनी दाखवले. ज्या ठिकाणी भांडण झाले होते ती जागा फिर्यादीने दाखवली. सदर घटनास्थळाच्या एका बाजूला कुंडलिक गळवे यांची जमीन, एका बाजूला मनोहर हिप्परकर यांचे घर, एका बाजूला डांबरी खराब रस्ता होता. रस्त्याच्या कडेने साईटपट्या होत्या. घटनास्थळाजवळ रस्ता खराब झाला होता व त्या ठिकाणी खडी पडलेली होती. त्या ठिकाणी एक लाईटचा खांब होता. पंचनामा संध्याकाळी ८.३० ते ९.१५ च्या दरम्यान लाईटच्या उजेडात केला. आता मला पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. पंचनाम्यास **निशाणी क्र.PW2-32** देण्यात येत आहे.
**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.पी.डी.जेडगे यांचेमार्फत सुरु**

२.		माझे शिक्षण बारावीपर्यंत झालेले आहे. मला व्यवस्थित लिहिता वाचता येते. गळवेवाडी येथे मी रहायला मापटेमळा येथे आहे. हे म्हणणे खरे नाही की, १० वर्षाच्या अलीकडे आमचे गळवेवाडी येथे घर नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी हा माझ्या शेजारी रहायला आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, फिर्यादीच्या घरापासून २ किमी अंतरावर रहायला आले. सध्याचे माझे घर व वाड्याचे टेक हे साडेतीन किमी अंतरावर आहे. गळवेवाडी गावच्या हद्दीत माझी जमीन आहे.

३.		हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हे तथाकथीत घटनास्थळाच्या पूर्वेला २ किमी अंतरावर राहतात. माझे सध्याचे घर गोविंद पार्कच्या शेजारी आहे. पंचनाम्याला मला गारळे पोलीस यांनी बोलवले होते. गारळे पोलीस यांनी मला फोन केला होता. तथाकथीत घटनास्थळाच्या उत्तरेस १ किमी अंतरावर माझे जुने घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत घटनास्थळाच्या पश्चिम व पूर्वेला राहती घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत घटनास्थळाच्या पश्चिमेला लागून लगेच मोटारसायकल रिपेअर, पंक्चर व किराणा दुकान आहे. किराणा दुकान हे दत्तात्रय गोडसे यांच्या मालकीचे आहे. मला याची माहिती नाही की, तिथे सी.सी.टी.व्ही. कॅमेरे आहेत किंवा कसे. अनिल गळवे हे माझ्या माहितीतील आहेत ते गावातीलच आहेत. अनिल गळवे हे गावात कुठे राहतात याची मला माहिती नाही. फिर्यादी हा मापटेमळा येथे राहतो. फिर्यादी हा मापटेमळ्यात नेमके कुठे राहतात याची मला माहिती नाही.

४.		हे म्हणणे खरे नाही की, रोहित करचे व विजय करचे हे माझे मित्र आहेत. मी, अनिल गळवे, रोहित करचे, विजय करचे, आकाश केंगार असे आम्ही दोस्ती ग्रुपचे मेंबर आहोत. मी रोहित याला ओळखत नाही. मी विजय याला ओळखत नाही. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत घटनास्थळाचा संपूर्ण रस्ता हा खडी उकडलेल्या अवस्थेमध्ये आहे. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत घटनास्थळाच्या चतुःसीमा मला सांगता येणार नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत घटनास्थळावर जाण्याचा मला कधी प्रसंग आला नाही त्यामुळे मला

चतुःसीमा सांगता येणार नाहीत.

५. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी लिहिलेले होते त्यावर आम्ही वाचून सही केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी स्वतः पोलीसांना असे लिहा तसे लिहा असे सुचवलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस स्टेशनमध्ये आम्ही पंचनाम्यावर सह्या केलेल्या आहेत. घटनास्थळी लाईटचा खांब होता असे मी पोलीसांना सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळी रात्री उजेडाचा कोणताही स्त्रोत नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी व त्याचा चुलतभाऊ अनिल गळवे हे आम्ही दोस्ती ग्रुपमधील असल्यामुळे फिर्यादीच्या सांगण्यावरुन पंचनाम्यावर सही केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या सांगण्यावरुन मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील आरोपीच्या हिताविरुध्द सांगितलेला संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीला मदत करण्यासाठी पंचनामा केला असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

समक्ष, श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2025.12.23 17:16:40 +0530

आटपाडी.
दिनांक : २३/१२/२०२५

(अ. जो. बाचुळकर)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
आटपाडी

*****